०/८



माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर, कात्रज, पुणे-४११०४६
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८००
जावक क्र. :- ००८२ दिनांक:- ३०/१२/२०२५

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

१. अपिलार्थी
ॲड. विशाल वि. पवार
ऑफिस क्र. १/बी,पहिला मजला,
शास्त्री कमिर्शयल कॉम्प्लेक्स,
मुकुंदनगर, पुणे-३७
संपर्क:- ९४२२५६३५५५
२. श्री.जीवन मराळे
जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

अपिलार्थी ॲड. विशाल पवार
विरुद्ध
जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक पुणे महानगरपालिका.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थी ॲड. विशाल पवार यांनी दि. १७/११/२०२५ रोजी अधीक्षक तथा जन माहिती अधिकारी महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे अर्ज करून माहितीची मागणी केलेली आहे.

माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्र.व दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
आ.क्र. ८०३३ दि.१७/११/२०२५	दि.१७/१२/२०२५	जा.क्र. ६९२१ दि.२७/११/२०२५	-	-

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :- श्री. जीवन मराळे,जन माहिती अधिकारी कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय पुणे महानगरपालिका पुणे जा.क्र.६९२१ दि. २७/११/२०२५ च्या माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती बाबत अपिलकर्तास प्राप्त माहिती दि. ०३/१२/२०२५.

प्रथम अपिल अर्जाचा तपशिल				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का?	प्रथम अपिल सुनावणी सूचना पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक
दि.०३/०१/२०२५	आ.क्र. ८८९२ दि.१६/१२/२०२५	होय	-	जा.क्र. ८४७३ दि.१९/०१/२०२६

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ:- २८/०१/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जन माहिती अधिकारी :- उपस्थित

विवेचन

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी हे उपस्थित होते तसेच श्री. जीवन मराळे जनमाहिती अधिकारी तथा अधीक्षक उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जात नमूद केलेनुसार दैनंदिन आवक-जावक बारनिशी रजिस्ट्ररला माहे १ ऑगस्ट २०२५ पासुन ते ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत आवक-जावक अर्जाच्या बाबतीत माहिती मिळणेबाबत तसेच माहे १ ऑगस्ट २०२५ पासुन ते ३ ऑक्टोबर २०२५ पर्यंतचे हालचाल नोंदवही (मुव्हिंग रजिस्ट्रर) च्या केलेल्या नोंदवहीची प्रती मिळणेबाबत मागणी केली आहे.

तद्नुषंगाने अपिलार्थी यांस दैनंदिन आवक-जावक बारनिशी विभागातील आवक झालेल्या अर्जांची माहितीची प्रत तसेच हालचाल नोंदवही (मुव्हिंग रजिस्ट्रर) ची प्रत अपिलार्थीस श्री. जीवन मराळे जनमाहिती अधिकारी तथा अधीक्षक यांचे म्हणणेनुसार देण्यात आली आहे. परंतु उर्वरित जावक अर्जासंदर्भातील माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली नसल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तरी, प्रथम अपिलीय अधिकारी तथा महा.सहा.आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांस उर्वरित माहिती देण्यात यावी असे सूचित केले आहे.

आदेश

मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, कोंढवा येवलेवाडी कार्यालय यांनी आदेशित केलेनुसार जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या मूळ अर्जात विचारणा केलेनुसार विभागाकडे उपलब्ध माहिती अपिलार्थीस देणेत यावी.

सबब सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(सुचिता पानसरे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महा.सहा.आयुक्त
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक:-
ठिकाण:-पुणे

टीप:- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (३) अन्वये निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मा. आयुक्त राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर पुणे-४११००१ यांचेकडे द्वितीय अपिल करता येईल.

२) या आदेशाची प्रत पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.